**प्रेस नोट दिनांक ०१/०६/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**चोरीस गेलेल्या ॲक्टीव्हा गाडीचा गाडीचा तात्काळ शोध घेवून मालकास परत.**

---------------------------------|||||||||------------------------------------

दि. ०१.०६.२०१९ रोजी इसम नामे रमेश शांतीप्रसाद अगरवाल रा. शिवणे उत्तमनगर पुणे यांनी मिठगंज पोलीस चौकीस येवून कळविले की, त्यांनी त्यांची एम.एच.१२.एच.एम.२५७० ॲक्टीव्हा गाडी ५६१ गुरूवार पेठ, वीर अर्जुन तरूण मंडळ येथून चोरी गेलेबाबत तक्रार देण्यासाठी आले होते. सदरवेळी चौकी अंमलदार पोना बारवकर यांनी मिठगंज मार्शलवरील कर्मचारी पोशि भोसले व पोशि दुरगुडे तसेच चौकी दप्तरी पोना पिसाळ यांचेसोबत गाडी चोरीस गेलेल्या ठिकाणचे घटनास्थळ पाहण्यासाठी गेले.

घटनास्थळ पाहुन नमुद कर्मचारी यांनी घटनास्थळाचे आजुबाजुचे परिसरात पेट्रोलींग करीत असताना, गवरीआळी दत्तमंदिर येथे तक्रारदार यांची एम.एच.१२.एच.एम.२५७० ॲक्टीव्हा गाडी मिळुन आली. नमुद कर्मचारी यांनी सदरची गाडी तक्रारदार यांना दाखवुन अर्जदार यांचेकडील कागदपत्रांची पडताळणी करून खात्री करून सदरची गाडी तक्रारदार यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे.

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

